# बोटांवरचा गुणाकार



गुणाकार करण्याची ही सोपी पद्धत रशियन क्रांतीपूर्वी रशियात वापरली जात असे. त्याकाळी लोक गरीब होते आणि मुलांना शाळेत पाठवणे त्यांना परवडत नसे. 6 ते 10 या आकड्यांचे गुणाकार करण्याचा हा एक सोपा मार्ग आहे.




चित्रात दाखवल्याप्रमाणे तुमच्या बोटांना 6 ते 10 असे क्रमांक द्या.

जर तुम्हाला 7 ला 8 ने गुणायचे असेल, तर एका हातावरच्या 7 क्रमांकाने दुसऱ्या हातावरील 8 क्रमांकाच्या बोटाला स्पर्श करा. आता ही दोन बोटे आणि त्यांच्या खाली असलेली सर्व बोटे 10 ची आहेत असे माना. पाच बोटे दहाची, म्हणजे ते झाले 50. आता डाव्या हातावरील राहिलेल्या बोटांना उजव्या हाताच्या राहिलेल्या बोटांनी गुणा. $3 \times 2 = 6$. आता 50 आणि 6 ची बेरीज करा, त्याचे उत्तर आले 56. यापद्धतीने नेहमीच बरोबर उत्तर मिळते.







7 x 8 = 50 + 6 = 56

FRAC / TION    EXPONENT    GRAPH

PENTAGON    DIVIDE    PYRAMID